**आयुक्तालय, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना - महाराष्ट्र, नागपूर**
**प्रशासकीय इमारत क्र. २, पहिला माळा, बी.विंग, सिव्हील लाईन्स, नागपूर - ४४०००१.**
**फोन नं. ०७१२-२५५१५५०, ई-मेल:** commissionermgnregsmah@gmail.com

पत्र क्रं. आयुक्तालय/आयईसी/1379 /२०२६ दि. 03/06/2026

**प्रति,**

मा. जिल्हाधिकारी तथा जिल्हा कार्यक्रम समन्वयक, मगांराग्रारोहयो, (सर्व)

मा. मुख्य कार्यकारी अधिकारी तथा सहजिल्हा कार्यक्रम समन्वयक,
मगांराग्रारोहयो, जिल्हा परिषद (सर्व)

**विषय** : VIKSIT BHARAT – GUARANTEE FOR ROZAR AND AJEEVIKA MISSION (GRAMIN): VB-G RAM G (विकसित भारत - जी राम जी) अधिनियम, २०२५ बाबत प्रचार प्रसार करण्याबाबत

**संदर्भ** : केंद्र शासनाच्या ग्रामिण विकास विभागाचे मा. संचालक यांचे पत्र क्र. K-११०११/०१/२०२५-RE-IV (३९४९२५), दि. १२.०१.२०२६

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने VIKSIT BHARAT – GUARANTEE FOR ROZAR AND AJEEVIKA MISSION (GRAMIN): VB-G RAM G (विकसित भारत - जी राम जी) या अधिनियमाची माहिती सर्व सामान्य जनतेला देण्यासाठी केंद्र शासनाने तयार केलेले जनसंवाद (Public Outreach) आधारित माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रमाचे वेळापत्रकानुसार प्रचार प्रसार करण्यासाठी संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात आले आले होते.

सदर कार्यक्रमांतर्गत माध्यम संवाद, हक्क संरक्षण प्रतिज्ञा दिन, विकसित भारत ग्राम संवाद, विषयाधारित जनजागृती उपक्रम, पंचायतराज प्रतिनिधींसोबत संवाद तसेच कामगार सन्मान कार्यक्रम अशा विविध उपक्रमांचे आयोजन करावयाचे आहेत.

सदर प्रस्तावित जनसंवाद कार्यक्रम हा माहिती-केंद्रित व प्रशासकीय स्वरूपाचा असून, आठवड्यानुसार वेळापत्रक, उपक्रम तसेच अपेक्षित परिणामांचा समावेश असलेला सविस्तर कार्यक्रम आराखडा पत्रासह परिशिष्ट – I मध्ये पाठविण्यात येत आहे. त्यानुसार, जिल्हास्तरापासून ग्रामपंचायत स्तरापर्यंत कार्यक्रमांची प्रभावी अंमलबजावणी सुनिश्चित करण्यासाठी मार्गदर्शक सूचना तयार करण्यात आलेल्या असून त्या पत्रासोबत जोडण्यात येत आहेत.

तरी, संलग्न मार्गदर्शक सूचनांनुसार जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांच्या समन्वयाने कार्यक्रमांचे नियोजन करून विहित कालावधीत प्रभावी अंमलबजावणी करण्यात यावी. तसेच प्रत्येक आठवड्याच्या कार्यक्रमांचे छायाचित्रांसह संक्षिप्त अहवाल, माध्यम प्रसिद्धी व विशेष उपक्रमांची माहिती नियमितपणे मार्गदर्शक सूचनांमध्ये निर्देशित केल्याप्रमाणे या कार्यालयास सादर करण्यात यावी, ही विनंती.

सोबत : वरीलप्रमाणे

(डॉ. विवेक घोडके)
**सहआयुक्त**
महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना
महाराष्ट्र, नागपूर

दिनांक -
जिल्हाधिकारी कार्यालय लातूर 04/06/2026
(रोहयो)
लिपिक - Pooja
अ.का. -
नायब तहसीलदार -
मा.उपजिल्हाधिकारी 5/06/2026
मा.जिल्हाधिकारी -
आवक क्रमांक - 785.
Email Received

परिशिष्ट – I

## विकसित भारत – G RAM G अधिनियम, २०२५
## या अधिनियमाची उपयुक्तता, कायदेशीर बळकटी आणि लाभ याबाबत जनजागृती करण्यासाठी माहिती, प्रचार व प्रसार कार्यक्रमाचे वेळापत्रक

### १. उद्दिष्ट

या जनजागृती आधारित माहिती, शिक्षण व संवाद (IEC) कार्यक्रमाचा उद्देश विकसित भारत – G RAM G अधिनियम, २०२५ मधील वैधानिक तरतुदी, ग्रामीण रोजगार हक्क, पारदर्शक वेतन वितरण व्यवस्था आणि ग्रामपंचायत आधारित अंमलबजावणी यंत्रणा यांविषयी वस्तुनिष्ठ माहिती, स्पष्टीकरण आणि जनजागृती करणे हा आहे. यामुळे राज्यस्तरापासून गावपातळीपर्यंत अधिनियमाच्या तरतुदींबाबत योग्य आणि एकसमान समज विकसित होईल.

### २. कार्यक्रमाचे स्वरूप

हा कार्यक्रम माहितीप्रधान व प्रशासकीय स्वरूपाचा असेल. सर्व उपक्रम जनजागृती, शिक्षण आणि संवाद या उद्देशाने राबविण्यात येतील.

**आठवड्यानुसार कार्यक्रमाचे वेळापत्रक**

❖ **पहिला आठवडा**

**"समज-गैरसमज (Myth vs Fact)" आणि "रोजगारापासून मालमत्ता निर्मितीकडे" – माध्यम संवाद**

**उपक्रम :**

- माहिती व जनसंपर्क विभागामार्फत राज्य व जिल्हास्तरीय माध्यम संवाद कार्यक्रम.
- मुद्रित, इलेक्ट्रॉनिक आणि सामाजिक माध्यमांसाठी महत्त्वाच्या मुद्द्यांचे प्रसारण.
- खालील बाबींचा समावेश असलेले एकपानी माहितीपत्रक वितरण :
  - १२५ दिवसांच्या रोजगाराची वैधानिक हमी
  - विलंबित मजूरीबाबतच्या तरतुदी
  - बेरोजगारी भत्ता
  - थेट लाभ हस्तांतरण (DBT)
  - पंचायतराज संस्थांची भूमिका
- नवीन अधिनियमांतर्गत निर्माण होणाऱ्या ग्रामीण मालमत्तांची उदाहरणे.

**अपेक्षित परिणाम :**

- वस्तुनिष्ठ व संतुलित माध्यम प्रसिद्धी.
- VB-G RAM G अधिनियम, २०२५ च्या वैधानिक वैशिष्ट्यांबाबत जनतेमध्ये स्पष्टता.

❖ <u>दुसरा आठवडा</u>

**"हक्क संरक्षण प्रतिज्ञा दिन"**

**उपक्रम :**

- गावपातळीवर सामूहिक प्रतिज्ञा :
  **"वेळेवर काम, पूर्ण मजूरी आणि पारदर्शकता"**
- फलक/बॅनर प्रदर्शन :
  **"अधिनियम सक्षम आहे, हक्क संरक्षित आहेत."**

**अपेक्षित परिणाम:**

- रोजगार हक्कांविषयी सामूहिक बांधिलकी निर्माण होणे.
- कामगारांमध्ये विश्वास व जागरूकता वाढणे.

❖ <u>तिसरा आठवडा</u>

**"विकसित भारत ग्राम संवाद"**

**उपक्रम :**

- चौपाल, ग्रामसभा किंवा गावस्तरीय बैठकींमध्ये पाच मिनिटांचा सोपा संवाद, ज्यामध्ये:
  - कामाचा वैधानिक हक्क
  - मजूरी देयक प्रक्रिया
  - बेरोजगारी भत्ता
  - अधिनियमांतर्गत नियोजन प्रक्रिया इत्यादी विषयांचा समावेश.
- भित्तीलेखन / फ्लेक्स बॅनरचा वापर :
  **"१२५ दिवसांचा रोजगार – प्रत्येक ग्रामीण कुटुंबाचा हक्क"**

**अपेक्षित परिणाम :**

- गावपातळीवर अधिनियमाची मूलभूत माहिती उपलब्ध होणे.
- हक्क व कार्यपद्धतीबाबत स्पष्ट जागरूकता निर्माण होणे.

❖ **चौथा आठवडा**

**विषयाधारित उपक्रम : "अहिंसेपासून हक्कांपर्यंत"**

**उपक्रम :**

- शाळांमध्ये "**महात्मा गांधी आणि विकसित भारतातील गावे**" या विषयावर **चित्रकला व उत्स्फूर्त वक्तृत्व स्पर्धा.**
- ग्रामस्थांसाठी विद्यार्थ्यांच्या चित्रांचे प्रदर्शन.
- गांधीजींच्या विचारांसह रोजगार हक्क जनजागृती रॅलीचे आयोजन. या रॅलीमध्ये सरपंच, पंच, स्वयं-सहाय्यता गट सदस्य, अंगणवाडी सेविका आणि मजूर यांचा सहभाग असेल. रॅलीचा समारोप ग्रामपंचायत किंवा सामुदायिक भवन येथे कार्यक्रम व मार्गदर्शनाने होईल.

**अपेक्षित परिणाम :**

- रोजगार हक्क आणि घटनात्मक मूल्ये यांचा परस्पर संबंध समजणे.
- समाजामध्ये सकारात्मक संवाद वाढीस लागणे.

❖ **पाचवा आठवडा**

**पंचायतराज प्रतिनिधींशी संवाद : "नवीन अधिनियम समजून घेऊया"**

**उपक्रम :**

- जिल्हा व तालुका स्तरावर पंचायतराज प्रतिनिधींसोबत चर्चा.
- नवीन अधिनियमाचे सादरीकरण.
- पूर्वीच्या अधिनियमातील त्रुटी नवीन अधिनियम कशा प्रकारे दूर करतो याचे स्पष्टीकरण.

**अपेक्षित परिणाम :**

- पंचायतराज प्रतिनिधींच्या भूमिका व जबाबदाऱ्यांबाबत स्पष्टता.
- अधिक प्रभावी प्रतिनिधित्व व अंमलबजावणी.

❖ **सहावा आठवडा**

**"विकसित भारत – कामगार सन्मान कार्यक्रम"**

**उपक्रम :**

- तालुका व जिल्हास्तरावर किमान १०० दिवस रोजगार पूर्ण केलेल्या कामगारांचा सत्कार.
- कामगारांचे अनुभव कथन :
  - ✓ पूर्वीच्या (मनरेगा) कायद्यांतर्गत आलेल्या अडचणी
  - ✓ नवीन अधिनियमातील १२५ दिवसांच्या रोजगार हमीबाबतच्या अपेक्षा व लाभ
  - ✓ इतर महत्त्वपूर्ण तरतुदींचा अनुभव

**अपेक्षित परिणाम:**

- कामगारांमध्ये सन्मान, आत्मविश्वास आणि स्वाभिमान वृद्धिंगत होणे.
- अधिनियमाच्या प्रत्यक्ष लाभांची व्यापक माहिती समाजापर्यंत पोहोचणे.

सविता